CR 201009 03 13

(२८८)

क्र.ना.भू-४/सिटीएस/सीआर/८०९२/२०१०
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कार्यालय
नविन प्रशासकिय इमारत, २ रा मजला
पुणे दिनांक :- ३/९/२०१०

9 SEP 2010

विषय :-नगर भूमापन झालेल्या शहर/ गावांचे मूळ अभिलेख जतन करणेबाबत.

परिपत्रक :-

नगर भूमापन नियमपुस्तीकेतील परिच्छेद १५६ मध्ये नगर भूमापन झालेल्या शहरांचे /गावांचे मूळ आलेख काळजीपूर्वक जतन करणेत यावेत अशी तरतुद आहे. नगर भूमापनाचे मूळ अभिलेख कसे सुरक्षित ठेवावे.याबाबत या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. एस.व्हि.९६५ दिनांक १२/०४/१९६१ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

अधिनस्त कार्यालयांना वेळोवेळी दिलेल्या भेटीसमयी मूळ नगर भूमापन अभिलेखाचे योग्य रितीने जतन केले जात नाही, ते सुरक्षीत ठिकाणी ठेवले जात नाहीत. असे निदर्शनास आलेले आहे. त्याचप्रमाणे मूळ नगर भूमापन आलेख अस्ताव्यस्त पडलेले असतात. त्याचप्रमाणे मूळ नगर भूमापन आलेखावरच पुर्नविलोकनाचेवेळी आढळुन आलेल्या दुरुस्त्या करणेत आलेल्या आहेत, अशा स्वरुपाच्या गंभीर अनियमिततासुद्धा निदर्शनास आलेल्या आहेत.

नगर भूमापन झालेल्या शहरांचे / गावांचे मूळ अभिलेख व चौकशी नोंदवहया हे अत्यंत मौल्यवान असून ते अमर्यादीत काळासाठी सुरक्षित ठेवणे आणि त्यांचे यथायोग्य पद्धतीने जतन करणे अत्यंत आवश्यक बाब आहे. त्याकरिता नगर भूमापन अधिकारी कार्यालयातील/उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयातील व त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व सजे / गावांचे मूळ नगर भूमापन अभिलेख परिशिष्ट सूची १ प्रमाणे **स्वतंत्र पेटीत नगर भूमापन अधिकारी/ उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचे अधीनस्त कक्षामध्ये ठेवावे, आणि जबाबदार कर्मचाऱ्याकडे सदर कक्षाची सुरक्षा व्यवस्था सोपवणे बाबतची कार्यवाही नगर भूमापन अधिकारी/उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी त्यांचे स्तरावर करावी.** कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यकता भासेल तेव्हा संबंधीत परिरक्षण भूमापक/अन्य कर्मचारी यांनी नगर भूमापन अधिकारी / उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे संधारण केलेल्या नोंदवहीमध्ये नोंद करुनच सदरचे अभिलेख व चौकशी नोंदवहया प्राप्त करुन घ्यावेत. आणि कामाची पूर्तता झाल्यानंतर पुन्हा मूळ स्थितीत ठेवावेत. व तशी नोंद नोंदवहीत करणेत यावी. **तसेच जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख / उपसंचालक भूमि अभिलेख यांना अपिल प्रकरणांमध्ये मूळ नगर भूमापन अभिलेख अवलोकन करावयाचे असल्यास त्याच्या प्रमाणीत प्रती सुनावणीचे वेळी मागून घ्याव्यात. मुळ अभिलेख उदा. नगर भूमापन आलेख, चौकशी नोंदवही सुनावणी वेळी घेवून उपस्थित राहणेबाबत नगर भूमापन अधीकारी / उप अधीक्षक भूमि अभिलेख यांना किंवा त्यांचे प्रतिनिधींना आदेश देण्यात येवू नयेत. याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.**

P_LEETER

908603

उपसंचालक भूमि अभिलेख

मूळ नगर भूमापन अभिलेख व चौकशी नोंदवहया सुरक्षित ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी नगर भूमापन अधिकारी / उप अधिक्षक भूमि अभिलेख यांचेवर असून संबंधीत कार्यालय प्रमुख यांची बदली झालेवर कार्यभार हस्तांतरणाचे वेळी सदर मूळ नगर भूमापन अभिलेख सोबतचे परिशिष्ट सुचिप्रमाणे सविस्तर यादी तयार करुन नव्याने पदभार धारण करणा-या अधिका-याकडे सुपूर्त केल्याचा दाखला ठेवावा.

वरील सूचनांचे पालन होत नसल्याचे आढळून आल्यास संबंधीत नगर भूमापन अधिकारी / उप अधिक्षक भूमि अभिलेख हे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील यांची समज घ्यावी.

स्वाक्षरी/-(डॉ. शैलेश कुमार शर्मा)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख(म.राज्य)पुणे.

प्रत:- उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त(सर्वसाधारण/भूमापन/नागरी भूमापन/एकत्रीकरण) यांना माहितीसाठी.
प्रत:- कार्यालय अधीक्षक लेखा-१,२,३,/आस्थापना-१,२,३,४,५/भूमापन-१,३,४,५/गांवठाण नागरी भूमापन-१,२,३,४/ एकत्रिकरण- १,२,३/ संगणक-१ यांना माहितीसाठी.
प्रत:- उपसंचालक भूमि अभिलेख,पुणे/मुंबई/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
प्रत:- जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख(सर्व)यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- उप अधीक्षक भूमि अभिलेख(सर्व)यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- नगर भूमापन अधिकारी(सर्व)यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.

"निर्गमित"
१।१२।१०
(दि. दि. क्षीरसागर)
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त(सर्वसाधारण)पुणे

P_LEETER

नगर भूमापनाकडील मूळ अभिलेख
परिशिष्ट सूचि - १

अ.क्र.	अभिलेखातील कागदपत्रे
१	ट्रव्हर्स बुक
२	ट्रव्हर्स नकाशे
३	कोन वाचन बुक
४	सविस्तर मोजणी आलेख (मूळ आलेख)
५	वसलेवार
६	चौकशी नोंदवहया
७	मिळकतीची नोंदवही
८	ए.बी.सी. नोटीसीच्या स्थळप्रती
९	बांधमाप पंजी